## JOURNAL INDEXING

8624946865
editor@yra.ijaar.co.in
www.yra.ijaar.co.in

ISSN - 2277-7911
Impact Factor - 5.519

# YOUNG RESEARCHER

## AN INTERDISCIPLINARY DOUBLE-BLIND PEER REVIEWED RESEARCH JOURNAL

VOL. 14 SPECIAL ISSUE 1
JANUARY 2025

YOUNG RESEARCHER ASSOCIATION, KOLHAPUR

SN – 2277-7911
Impact Factor – 5.958
YOUNG RESEARCHER
A Multidisciplinary Peer-Reviewed Refereed Research Journal
January - 2025
Vol. 14
Special Issue
No. 1

# कृषी क्षेत्रातील समस्या आणि उपायोजना

प्रा. डॉ. सुरेखा तुकाराम रोंगटे[1], सागर रामराव कुंडले[2]
[1]मार्गदर्शक, अर्थशास्त्र विभाग, फर्गुसन महाविद्यालय, पुणे.
[2]संशोधक विद्यार्थी, अर्थशास्त्र विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
*Corresponding Author:* प्रा. डॉ. सुरेखा तुकाराम रोंगटे

DOI - 10.5281/zenodo.14880964

**गोषवारा:**

कृषी व्यवसाय हा जगातील अत्यंत पुरातन व्यवसाय असून आधुनिक काळातही तो व्यापक प्रमाणात केला जातो. मागील काही वर्षापासून भारतातील काही राज्यात अनेक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे प्रसिद्ध आहे. या आत्महत्या प्रामुख्याने महाराष्ट्र, आंध्रप्रदेश, कर्नाटक, केरळ व पंजाबसारख्या राज्यात झालेल्या आहेत. प्रचंड कर्जबाजारीपणा हे या आत्महत्या होण्यामागील मुख्य कारण असल्याचे अनेक अभ्यासावरून स्पष्ट झाले आहे. कृषीचा विकास झाल्यास इतर सर्वच क्षेत्राचा विकास साधला जातो हे आता सर्वांना मान्य झाले असून त्यावर उपाय शोधण्याचे काम राज्य व केंद्र सरकारच्या पातळीवर गतीमान झाल्याचे दिसते. महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्याचे कृषी नियोजन करण्याचे ठरवले, ही एक अभिनंदनीय बाब मानली पाहिजे. या नियोजनात एक म्हणजे योजनेत कृषी व कृषीसंदर्भात आर्थिक विकास दर साध्य करणे व कृषीक्षेत्रावरील लोकसंख्याचा भार कमी करणे आहे. शासनाने या क्षेत्रात नियंत्रकाची भूमिका न घेता केवळ प्रोत्साहकाची भूमिका घ्यावी. सुप्रसिद्ध कृषीशास्त्रज्ञ स्वामीनाथन यांनी " भारतीय कृषि व्यवस्थेत काहीतरी भयंकर चूक होते आहे व जर कृषी क्षेत्रात चूक होत असेल तर इतर कोणत्याही क्षेत्राचे भले होऊ शकणार नाही", असे म्हटले आहे.

जगातील जवळ-जवळ दोन तृतीयांश लोकांचा प्रमुख व्यवसाय शेती हा आहे. कृषीक्षेत्र सर्व विकासाची जननी आहे. जगातील विकसित राष्ट्रांनी अगोदर उपलब्ध संसाधनांचा सुयोग्य वापर करून कृषी उत्पादनात संख्यात्मक व त्यानंतर गुणात्मक सुधारणा केली आणि पुढे कालांतराने प्रगत व व्यापारी शेतीचा विकास करण्यासाठी त्यांनी सतत प्रयत्न केले. इंग्लंडचा इतिहास स्पष्ट दर्शवतो की, तेथे कृषी क्रांतीमुळे औद्योगिक क्रांती झाली. अमेरिका आणि जपानमध्ये सुद्धा कृषी विकासामुळे औद्योगीकरणाच्या प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात विस्तार होण्यास मदत झाली. जगातील विकसित देशावरून असे लक्षात येते की, औद्योगिक आणि सेवा क्षेत्राचा विकास हा व्यापक अर्थाने शेती क्षेत्रावरच अवलंबून आहे म्हणूनच कृषीक्षेत्र मानवी जीवनाला पोषक आणि प्रगतीसाठी आवश्यक मानले गेले आहे. विकसनशील अर्थव्यवस्थेत देखील कृषीक्षेत्र मुलभूत असते. कारण सकल राष्ट्रीय उत्पन्नात मोठा वाटा, वाढत्या लोकसंख्येला रोजगार आणि अन्नधान्याची उपलब्धता, निर्यातीतील हिस्सा, विदेशी चलन प्राप्ती, औद्योगिक विकासासाठी कच्चा माल व श्रम पुरवठा, अंतर्गत बाह्य-व्यापार इ. मुख्य आधार कृषी क्षेत्रच असते.

**की वर्ड: उत्पन्न, जलसिंचन, पतपुरवठा, कीटकनाशके, खते, बी-बियाणे**

**प्रस्तावना:**

भारत हा कृषीप्रधान देश असून .शेती हा प्रमुख व्यवसाय आहे. देशाच्या आर्थिक विकास प्रामुख्याने कृषी विकासावर अवलंबून आहे. कृषी क्षेत्राचा विकास झाल्यास इतर सर्व क्षेत्राचा विकास साधला जातो. शेतकरी हा जगाचा पोशिंदा असून त्या शेतकऱ्यांवर आत्महत्या करण्याची वेळ आली आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या होण्यास बरेच घटक कारणीभूत आहेत. उदा. कर्जबाजारीपणा, अवकाळी पाऊस, दुष्काळ ,वस्तूच्या दरामध्ये कमी-जास्त प्रमाण, महापूर, गारपीट, खताचे वाढते दर, या सर्व कारणामुळे शेतकऱ्याच्या आत्महत्या होत आहेत. विकसित देशाच्या होण्याऱ्या प्रगतीवरून असे लक्षात येते की, औद्योगिक व सेवा क्षेत्राचा विकास हा शेती क्षेत्रावर

अवलंबून आहे. अल्पविकसित अर्थव्यवस्थादेखील जोपर्यंत कृषी क्षेत्राकडे लक्ष देत नाहीत.तोपर्यंत त्या विकासाचा चांगला दर प्राप्त करू शकत नाहीत.कारण या अर्थव्यवस्थेत मुख्य प्रश्न भांडवलाचा अभाव हा असतो आणि कृषी क्षेत्राच्या विकासासाठी इतर क्षेत्राच्या तुलनेत कमी भांडवलाची गरज लागते . विकासाच्या सुरवातीच्या टप्यात कृषी क्षेत्राच्या विकासाला चालना खऱ्या अर्थाने विकास होऊ शकतो. कृषी क्षेत्रातील उत्पादनातील विविधता आणि स्वरूपातील भिन्नता यामुळे कृषी एक उद्योग नसून, वास्तवात अनेक उद्योगांचा प्रमुख सूचक आहे. विकासाचा खरा प्रेरक आहे. म्हणूनच शेती हाच आर्थिक विकासासाठी मुलभूत व्यवसाय आहे.

जमीन आणि कृषी प्राचीन भारतीय संस्कृतीचा मुख्य आधार आहे. भारताच्या आर्थिक विकासाला गती आणि शाश्वती देण्यासाठी कृषीक्षेत्राचा सर्वांगीण विकास होणे आवश्यक आहे. भारताचे एकून भौगोलिक क्षेत्रफळ ३२.४४ कोटी हेक्टर आहे. त्यापैकी १४ कोटी २६ लाख हेक्टर क्षेत्रावर शेती केली जाते. तसेच निव्वळ पिकाखालील क्षेत्र १० कोटी हेक्टर आहे. म्हणजे जवळ जवळ ४७ टक्के क्षेत्रफळावर प्रत्यक्षरीत्या शेती केली जाते.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये:**

१. भारतीय अर्थव्यवस्थेत शेती क्षेत्राच्या योगदानाचा अभ्यास करणे.
२. शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या समस्यांचा अभ्यास करणे.
३. कृषी क्षेत्राच्या समस्यांवरील उपयोजना सुचवणे.

**कृषी अर्थशास्त्र:**

प्रा. टेलर यांच्यामते,

"महत्तम सामाजिक हिताच्या दृष्टीने स्वत:साठी अधिकतम नफा मिळवताना उत्पादन कशाचे करावे, उत्पादन कसे करावे व कश्या पद्धतीने विकावे यासारख्या प्रश्नाबाबत मार्गदर्शन करणारे शास्त्र म्हणजे कृषी अर्थशास्त्र होय."

**भारतीय शेतीसमोरील समस्या / आव्हाने:**

**१. पर्जन्यमान:**

भारतामध्ये अनियमित स्वरूपाचे पर्जन्यमान आहे. बदलत्या वातावरणामुळे जून ते सप्टेंबर या कालावधीमध्ये पर्जन्यमान खूपच कमी प्रमाणात होते. अन्य ऋतूमध्ये अवकाळी पाऊस पडत असल्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे.

देशातील भौगोलिक परिस्थिती वेगवेगळी असल्यामुळे शेतकऱ्यांना व्यापारी व नगदी पिकांचे उत्पादन घेता येत नाही. शेतकरी पेरणी करतो परतूवेळेवर पाऊस पडत नसल्यामुळे शेतकरी वर्गाला दुबार पेरणी करावी लागते. यामुळे आर्थिक भार सहन करावा लागतो .उदा . महाराष्ट्रातील सातारा जिल्हात फक्त ४० दिवस पाऊस पढतो .

**२. अशिक्षित शेतकरी वर्ग:**

भारतातील शेतकरी वर्ग हा अशिक्षित असल्यामुळे नवीन संकरित बी- बियाणे, खते, कीटकनाशके याचा वापर कोणत्या प्रकारे करावा या बद्दल विशेष ज्ञान नसल्यामुळे शेती उत्पनामधून शेतकऱ्यांना योग्य तो फायदा होताना दिसत नाही.तसेच, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करत नाही. शेतकरी पारंपारिक पद्धतीने शेती करत असल्यामुळे शेतीची उत्पादकता कमी आहे.

३. जलसिंचनाच्या अपुऱ्या सुविधा:

भारतीय शेती ही पूर्णपणे पावसाच्या पाण्यावर अवलंबून असल्यामुळे शेतकऱ्याला बारमाही पिकाची लागवड करता येत नाही. भारतात एकूण जमिनीपैकी फक्त २८ टक्के जमिनीस पाणी पुरवठा होतो. जोपर्यंत जलसिंचनाच्या सोयी पूर्णपणे निर्माण केल्या जात नाहीत तोपर्यंत खते, बी-बियाणांचा वापर चांगल्या प्रकारे वापर करता येणार नाही. जलसिंचनाचे शाश्वत घटक उपलब्ध नसल्यामुळे उत्पादकता कमी होते. ग्रामीण भागात शेतकरी वर्गाची स्वत: ची मालकीची विहीर , शेततळे उपलब्ध पिकाला योग्य प्रमाणात पाणी देऊ शकत नाही .विजेचे भारनियमन १० ते १२ तास असल्यामुळे पिकास योग्य पाणी देऊ शकत नाही .

४. अपुरा पतपुरवठा:

शेती क्षेत्राला होणारा पतपुरवठा कमी स्वरूपाचा असल्यामुळे शेतकरी शेतीमध्ये सुधारणा करू शकत नाही. गोरावाला समितीने कृषी क्षेत्राला होणारा पतपुरवठा मुख्यत: सावकरांकडून होतो हे स्पष्ट केले आहे. शेतकरी सावकाराकडून जास्त व्याजदराने कर्ज घेऊन शेतीच्या कामासाठी वापरतात आणि शेतीच्या उत्पन्नाला योग्य तो भाव मिळत नसल्यामुळे शेतकरी सावकाराच्या कर्जाची परत फेड वेळेत करू शकत नाही त्यामुळे सावकाराच्या त्रासाला कंटाळून शेतकरी आत्महत्या करतात. त्यामुळे शेतकरी कर्जात जन्मतो आणि कर्जात मरतो . शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे प्रमाण वाढत आहे. शेतकऱ्यांना स्थानिक बँका व राष्ट्रीयकृत बँका यांच्या कडून दीर्घ मुदतीचा कर्जपुरवठा केला जात नसल्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक बाबींचा सामना करावा लागतो. त्यामुळे शेतकऱ्याला शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शेती मध्ये सुधारणा करता येत नाहीत आणि त्यामुळे शेती व्यवसायामध्ये प्रगती होताना दिसत नाही.

५. धारण क्षेत्राचा आकार:

भारतात ८९ टक्के शेतकऱ्यांजवळ एकूण शेती क्षेत्राच्या ३० टक्के जमीन आहे. प्रत्येक शेतकरी साधारणत: २ हेक्टर शेतीचा मालक आहे. त्यामुळे शेतीचे तुकडीकरण झाले आहे. शेतजमिनीच्या तुकडीकरणामुळे शेतीमध्ये नवीन तंत्रज्ञान व यंत्राचा वापर करू शकत नसल्यामुळे शेतीमधील उत्पादकता कमी राहते.

६. शेतमालाचा उत्पादन खर्च व आधारभूत किंमती :

देशातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या होण्यामागील प्रमुख कारण म्हणजे शेत मालाला योग्य हमीभाव मिळत नाही. शेतीमध्ये उत्पादन घेत असताना खते, बी-बियाणे यांच्या किंमती दिवसेंदिवस वाढत आहेत. येणारा उत्पादन खर्च जास्त असल्यामुळे शेतकऱ्यांना पाहिजे त्या प्रमाणात शेती व्यवसायातून नफा होत नाही. सरकारकडून शेतमालाला पूर्वी जाहीर केलेल्या आधारभूत किंमतीपेक्षा शेतमाल कमी दराने खरेदी केल्यामुळे शेतकऱ्याना आर्थिक भार सहन करावा लागतो. आधारभूत किमत व शेतमालाचा हमीभाव यामध्ये बरीच तफावत आढळते .

७. लोकसंख्येचा जमिनीवरील अतिरिक्त ताण:

भारतातील लोकसंख्या वाढीचा वार्षिक दर २.५ टक्केने वाढीचा दर आहे. भारतातील अद्यापही ७० टक्के लोक शेती व्यवयावर उपजीविका करत असल्यामुळे शेती क्षेत्रावरती अतिरिक्त ताण पडत आहे. शेती व्यवसायत हंगामी गामी स्वरूपाचे काम उपलब्ध असल्यामुळे शेती मध्ये सुप्त बेकारी जास्त प्रमाणात आढळते .

८. शेती संशोधनाकडे दुर्लक्ष:

भारतीय शेती क्षेत्रामधील संशोधनाचे प्रमाण कमी आहे. शेती क्षेत्रातील नवनवीन खते, कीटकनाशके, बी-बियाणे यावरती संशोधन केले जात नसल्यामुळे शेतकरी वर्ग पारंपारिक बी- बियाणाचा

र करतो, त्यामुळे शेतीतील उत्पादकता कमी होत हे.

**विपणन व्यवस्थेतील दोष:**

शेतकऱ्यांनी उत्पादित केलेला शेतमाल थानिक बाजारपेठेत विकतो. बहुतेक शेतकरीवर्ग हा ग्रामीण भागातील असल्यामुळे तो निरक्षर असल्यामुळे शेतमाल येईल त्या किंमतीस शेतमालाची विक्री करतो. दलाल, मध्यस्थी याची साखळी असल्यामुळे शेतकऱ्या चा माल कमी किंमतीला खरेदी केला जातो. शेतकऱ्याची सौदा शक्ती कमी असल्यामुळे तो राष्टीय पातळीवर माल विक्री करू शकत नाही. शेतामालाला योग्य भाव मिळण्यासाठी दलाल, व्यापारी लोकांची साखळी नष्ट केली पाहिजे.तरच शेतकऱ्याचा आर्थिक प्रगती होईल.

**१०. साठवणूक गृहांची संख्या कमी असणे:**

शेतकऱ्याने उत्पादित केलेला मालाला योग्य बाजारभाव प्राप्त पर्यंत होई शेतकरी प्रतिक्षा करू शकत नाही त्यामुळे शेतकरी शेतमाल गोदामात ठेऊ शकत नाही. त्यामुळे मालाची मोठ्या प्रमाणात नासाडी होते. त्यामुळे शेतकरी वर्गाचे आर्थिक नुकसान मोठ्या प्रमाणात होते.

**शेती क्षेत्रातील उत्पादन वाढीसाठी उपयोजना:**

कृषी क्षेत्राची उत्पादकता वाढवणे काळाची गरज आहे. दिवसेंदिवस लोकसंख्या वाढ होत असल्यामुळे भूमी पुरवठा स्थिर आहे. त्यामुळे उपलब्ध असलेल्या भूमीत वाढत्या लोकसंख्येला पुरेल एवढा अन्नधान्य मिळणे अपेक्षित आहे. त्यामुळे कृषी क्षेत्रातील उत्पादन वाढीसाठी वेगवेगळ्या उपयोजना राबवणे गरजेचे आहे. त्या उपायोजना खालीलप्रमाणे स्पष्ट केल्या आहेत.

**१. शेतीला पूरक व्यवसाय:**

ग्रामीण भागातील शेतकऱ्यांनी शेतीला जोडधंदा म्हणून कुक्कुटपालन, शेळीपालन, मत्स्यपालन, मधुमक्षिकापालन, पशुपालन, मेंडीपालन या व्यवसायांना चालना दिली पाहिजे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीमध्ये सुधारणा होण्यास मदत होईल.

**२. जमीन सुधारणांची कार्यवाही:**

स्वातंत्र्योत्तर काळात जमीन सुधारणा करण्याकरता जमीनदारी निर्मुलन कायदा, कुळ सुधारणा कायदा, कमाल जमीन धारणा कायदा व तुकड्यांच्या एकत्रिकरणाचा कायदा इ. वेगवेगळे कायदे अंमलात आले. पण या कायद्याची कार्यवाही समाधानकारक झाली नाही. म्हणून राज्यसरकारने प्रभावी कार्यवाही करण्याकरता विशेष प्रयत्न करण्याची गरज आहे.

**३. सेंद्रिय शेती:**

शेतीमधून जास्त उत्पादन मिळवण्यासाठी रासायनिक खते, कीटकनाशकांचा जास्त वापर केल्यामुळे जमिनीचा पोत बिघडतो. खतांच्या अतिवापरामुळे शेतजमिनी नापीक होत आहेत तसेच मानवी आरोग्यावर अनिष्ट परिणाम होत आहे.त्यामुळे शेतकऱ्यांनी या आधुनिक युगामध्ये सेंद्रिय शेतीचा अवलंब करणे काळाची गरज आहे.

**४. शेती संशोधन:**

कृषी उत्पादकता वाढविण्यासाठी केंद्र सरकार व राज्य सरकार, कृषीविद्यापिठे यांनी पुढाकार घेऊन निरनिराळ्या पिकांच्या जाती, संकरित बी- बियाणे, आधुनिक तंत्रज्ञान याविषयी शेतकऱ्यांना वेळोवेळी मार्गदर्शन केले पाहिजे आणि शेती संशोधनावर भर दिला पाहिजे.

**५. जलसिंचनाची उपलब्धता:**

कृषी उत्पादकता वाढविण्यासाठी शेतीला कायमस्वरूपी जलसिंचनाची गरज असते. कालवे, नद्या, विहिरी, जलसिंचन प्रकल्प यांच्या माध्यमातून शेतीला भरपूर प्रमाणात पाणीपुरवठा करणे गरजेचे आहे. सिंचन समितीने सुचवलेल्या शिफारशी प्रत्यक्षात अंमलात आणणे गरजेचे आहे.

पतपुरवठ्याच्या सोई:

शेतकऱ्यांना शेतीमध्ये सुधारणा घडवून ाणण्यासाठी शेतकऱ्यांना मध्यम व दीर्घ मुदतीच्या र्जपुरवठ्याची सुविधा उपलब्ध करून दिली पाहिजे. यापारी बँका आणि प्रादेशिक ग्रामीण बँका यांनी लहान शेतकऱ्यांना पुरेसा कर्ज पुरवठा तसेच तारण कर्ज, किसान डेबिट कार्ड या सारख्या सुविधा उपलब्ध करून दिल्या पाहिजेत.

७. **प्रशिक्षण व चर्चासत्र:**

शेतकऱ्यांना नवनवीन खते, बी-बियाणे, कीटकनाशके,पशुपालनामध्ये संकरित गायी आणि म्हैशीचा जाती, आधुनिक तंत्रज्ञान उदा. AI प्रणाली, ड्रोनद्वारे पिकावर कीटकनाशक फवारणी, बियाणाची पेरणी, शेतमाल विपणन यासंबंधी माहित मिळावी म्हणून तालुका व जिल्हा स्थरावर कृषी प्रदर्शने, प्रशिक्षण व चर्चासत्रे आयोजित करण्यात यावीत.

८. **पिक विमा योजना:**

पिक विमा योजनेंतर्गत शेतकऱ्यांच्या पिकाचे व उत्पन्नाचे संरक्षण करता येते. शेतातील पिकांचे अतिवृष्टी, दुष्काळ, पिकावरील रोग यामुळे शेतकऱ्यांचे होणारे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी केंद्र व राज्य सरकार तसेच विमा कंपन्याकडून वेगवेगळ्या पिक विमा योजना राबवण्यात आल्या पाहिजेत व पिक विमा योजनेबाबत शेतकऱ्यांना माहिती दिली पाहिजे.

**निष्कर्ष:**

भारतीय शेती क्षेत्रासमोरील आव्हाने व समस्या कमी करण्यासाठी वरील सर्व उपयोजना सरकारने प्रत्यक्ष अंमलात आणल्यास शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यात यश येईल. तसेच, शेती उत्पन्नामध्ये वाढ घडून येईल. देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नामध्ये वाढ झाल्यास शेतकऱ्यांचा सर्वांगीण विकास होईल व आर्थिक स्तर उंचावेल.

**संदर्भग्रंथ:**

१. डॉ.दत्तात्रय भुतेकर,कृषी अर्थशास्त्र ( सप्टेंबर २०१५) औरंगाबाद : कैलास पब्लिकेशन
२. डॉ.कवीमंडन विजय – कृषी व ग्रामीण अर्थशास्त्र ,श्री. मंगेश प्रकाशन,नागपूर २०१२.
३. Economic survey of Govt. of Maharashtra
४. Economic survey of Govt. of New Delhi.
५. ॲग्रोवन मासिक
६. www.ijfmr.com
७. www.maxmaharashtra.com

# YOUNG RESEARCHER

A Multidisciplinary Peer-Reviewed, Refereed, Indexed & Open Access Research Journal

# CERTIFICATE

We hereby awarding this certificate to सागर रामराव कुंडले in recognition of the publication of the paper entitled कृषी क्षेत्रातील समस्या आणि उपायोजना Published in **Young Researcher** ***(ISSN 2277-7911) Impact Factor: 5.958*** Volume **S-14** – Issue **1**, **January - 2025.**

Young Researcher Association, Kolhapur — Young Researcher ISSN - 2277-7911 — Since - 2012

***Website - yra.ijaar.co.in***

**Dr. Pravin Talekar**
***Executive Editor***